जनसंपर्क कक्ष
01 JUL 2022 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डेक्कनमध्ये 'इंटेरिअर'साठी प्रवेश सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** इंटेरिअर डिझाईन क्षेत्राचे परिपूर्ण व्यावसायिक ज्ञान देणाऱ्या कोल्हापुरातील डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये विविध प्रकारचे व्यावसायिक कोर्स उपलब्ध असून, संस्थेत इंटेरिअर डिझाईनची शिवाजी विद्यापीठ मान्यता पदवी व महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळ मान्यताप्राप्त डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या मोजक्याच जागा शिल्लक आहेत.

या कोर्ससोबत संस्थेत महाराष्ट्र राज्य व्यावसायिक शिक्षण मंडळ यांचा रोजगार कौशल्य आधारित अभ्यासक्रम बिल्डिंग साईट सुपरवायझर हा एक वर्ष कालावधीचा व प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त इंटेरिअरस्केप गार्डन डिझाईन आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम व्हॅल्युएशन ऑफ इम्मूव्हेबल प्रॉपर्टी इत्यादी कोर्सेस संस्थेमध्ये सुरू आहेत.

पदवी, पदविका व सर्टिफिकेट कोर्सच्या माध्यमातून कमी कालावधीत विद्यार्थी सदर कोर्स पूर्ण झाल्यानंतर स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतो व इंटेरिअर डिझाईन या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करू शकतो.

प्रवेशाबद्दलच्या अधिक माहितीसाठी डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, तिसरा मजला, कॉसमॉस कॉम्प्लेक्स, न्यू शाहूपुरी, स्टेशन रोड, कोल्हापूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

लोकमत

# विद्यार्थिदशेतच मोठी स्वप्ने पाहा : डोंगळे

म्हाकवे : विद्यार्थीदशेतच मोठी स्वप्ने पाहून ती साध्य करण्यासाठी पाठलाग करावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक विभागातील संशोधक प्रा. तुकाराम डोंगळे यांनी केले. विज्ञान शाखेतून परदेशातही करिअरची मोठी संधी असल्याचेही त्यांनी सांगितले. शेंडूरच्या मानव हायस्कूलमध्ये करिअर मार्गदर्शनाचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते.

लोकमत

# आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवा: पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी, धाडस, सातत्य, कष्ट आणि अभ्यासाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. न्यू कॉलेज येथे वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष के. जी. पाटील होते.

प्रकुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी महाविद्यालय स्तरावर योग्यवेळी ध्येय ठरवून त्या ध्येयाचा सातत्यपूर्ण पाठलाग करावा.

यावेळी जिल्हा, राज्य, राष्ट्रीय पातळीवर चमकलेल्या विद्यार्थी व खेळाडूंचा गौरव करण्यात आला.

लोकमत

# पदवीधर नोंदणीची ७ जुलैपर्यंत मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ नोंदणीकृत पदवीधर मतदार नोंदणीस ७ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. याबाबतची मागणी आजी-माजी विद्यार्थी कृती समिती, मनविसे विद्यार्थी संघटना आणि मराठा ऑर्गनायझेशनच्यावतीने करण्यात आली होती. त्यास अनुसरून शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने हा निर्णय घेतला.

अधिसभेच्या निवडणुकीसाठी प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी व महाविद्यालयीन शिक्षक, विद्यापरिषदेच्या निवडणुकीसाठी महाविद्यालयीन शिक्षक व विभागप्रमुखांची मतदारयादी तयार करण्यासाठी ३० जूनपर्यंत भरण्यासाठी मुदत देण्यात आली होती. परंतु ती काही महाविद्यालयांकडून व संस्थांकडून मिळाली नाही. त्यामुळे कोणताही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये. या हेतूने महाविद्यालयीन शिक्षक, महाविद्यालयीन विभागप्रमुख, प्राचार्य व व्यवस्थापन प्रतिनिधी यांची माहिती ऑनलाइन पद्धतीने विद्यापीठ संकेतस्थळावर भरण्यासाठी ७ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ऑनलाइन पद्धतीने भरलेली माहिती आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयाकडे ११ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत सादर करण्यासाठी मुदतवाढ आहे.

लोकमत

# फिल्म मेकिंगचा विद्यार्थ्यांना फायदा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भविष्यात विद्यार्थ्यांना चित्रपट क्षेत्रात करिअर करायचे असल्यास या फिल्ममेकिंग कार्यशाळेचा नक्कीच उपयोग होईल, असे प्रतिपादन विजापुरातील अक्कमहादेवी महिला विद्यापीठाचे माजी कुलगुरू व जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागप्रमुख डॉ. ओंकार काकडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने दोनदिवसीय फिल्म मेकिंग या कार्यशाळेच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार, अनुप जत्राटकर, सोमदत्त देसाई उपस्थित होते.

पुढारी

# सिनेट पदवीधर नोंदणीसाठी मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सिनेट पदवीधर नोंदणीसाठी दि. ७ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यापीठ अधिसभेच्या प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, नोंदणीकृत पदवीधर आणि शिक्षक तसेच विद्यापरिषदेत निवडून द्यायचे आठ शिक्षक व अभ्यास मंडळासाठी निवडून द्यायचे विभागप्रमुख यासाठी मतदार यादी तयार करणे व नोंदणीकृत पदवीधर मतदार नोंदणी २०२२ मधील नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. ऑनलाईन भरलेली माहिती आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयाकडे ११ जुलैपर्यंत सायंकाळी ६ वाजेपर्यंत पाठविण्यास मुदत दिल्याचे विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या परिपत्रकात म्हटले आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ अधिसभा : मतदार नोंदणीस मुदतवाढ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेसाठी मतदार यादी तयारी करण्याची मुदत ३० जूनपर्यंत होती. आता त्यास ७ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे, अशी माहिती प्रशासनाने प्रसिद्ध केली आहे. गुरुवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत पदवीधरांसाठी २० हजार, तर शिक्षक-प्राचार्य यांची १५८ महाविद्यालयांची माहिती मिळाली आहे. माहिती ऑनलाईन भरण्यासाठी मुदतवाढ दिली असून ही माहिती कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयाकडे दि. ११ जुलैला सायंकाळी ६ वाजेपर्यंत पाठवण्याची मुदत आहे.

पुण्यनगरी

# कानपूर विद्यापीठास शाहू चरित्र ग्रंथ भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठ आणि कानपूर (उत्तर प्रदेश) येथील छत्रपती शाहू महाराज युनिव्हर्सिटी यांच्यातील सहसंबंधांची एक अनोखी सुरुवात झाली. शिवाजी विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशक धोरण केंद्रातील प्रा. अविनाश भाले यांना कानपूर विद्यापीठाने शाहू जयंतीच्या मुख्य कार्यक्रमात बीजभाषक म्हणून विशेष आमंत्रित केले. त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठातर्फे कानपूर विद्यापीठास ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार लिखित व हिंदी अनुवादित शाहू चरित्र ग्रंथ भेट देण्यात आला. त्याबद्दलची कृतज्ञता कुलगुरू प्रा. विनयकुमार पाठक यांनी व्यक्त केली. कानपूरमध्ये राजर्षींच्या नावे असणाऱ्या विद्यापीठाशी स्नेहबंधांचा एक नवा अध्याय आता माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या साक्षीने शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून सुरू होतो आहे. कानपूर येथील छत्रपती शाहू महाराज विद्यापीठात स्कूल ऑफ आर्टस् ह्युमॅनिटी आणि सोशल सायन्सेसतर्फे आयोजित शाहू जयंतीच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी खासदार संभाजीराजे छत्रपती होते. यावेळी संभाजीराजे छत्रपती यांनी त्यांच्या ट्रस्टतर्फे विधवांच्या मुलांच्या शिक्षणासाठी १० लाख रुपयांची मदत जाहीर केली.

01 JUL 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीधर मतदार नोंदणीला मुदतवाढ

**कोल्हापूर, ता. ३० :** शिवाजी विद्यापीठाची अधिसभेची मुदत ऑगस्टमध्ये संपते आहे. त्यासाठी पदवीधर नोंदणीची मुदत आज संपणार होती. मात्र, प्रशासनाने नोंदणीस ११ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे. आजअखेर २० हजार जणांची नोंदणी झाल्याची माहिती प्रशासनाने दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेच्या प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, नोंदणीकृत पदवीधर आणि शिक्षक तसेच विद्यापरिषदेमध्ये निवडून द्यावयाचे ८ शिक्षक आणि अभ्यासमंडळासाठी निवडून द्यावयाचे विभाग प्रमुख यासाठी मतदार यादी करण्यासाठी नोंदणी करण्याची मुदत ३० जूनपर्यंत होती. आज सायंकाळी ५ वाजेपर्यंत पदवीधरांसाठी २० हजार नोंदणी झाली आहे व महाविद्यालयातील शिक्षक, प्राचार्य यांची १५८ महाविद्यालयांची माहिती प्राप्त झाली आहे. अधिकाधिक मतदारांना नोंदणी करता यावी यासाठी मुदत सात दिवसांसाठी वाढवली आहे.

जनसंपर्क कक्ष
01 JUL 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फिल्म मेकिंगचा विद्यार्थ्यांना फायदा

## विजापूर येथील जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशनचे डॉ. ओंकार काकडे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

'भविष्यात विद्यार्थ्यांना चित्रपट क्षेत्रात करिअर करायचे असल्यास या फिल्ममेकिंग कार्यशाळेचा नक्कीच उपयोग होईल', असे प्रतिपादन विजापूर येथील अक्कमहादेवी महिला विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागप्रमुख प्रा. डॉ. ओंकार काकडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित 'फिल्म मेकिंग' कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'फिल्म मेकिंग' हा मानव्यशास्त्र सभागृहातील कार्यशाळेचा विषय आहे. राष्ट्रीय स्तरावर पारितोषिक ज्या विद्यार्थ्यांच्या लघुपटाला मिळाले त्या सोमदत्त देसाई, मल्हार जोशी आणि आकाश बोकमूरकर यांचा सत्कार केला.

दुसऱ्या सत्रात चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया म्हणाले, "एखाद्या चित्रपटाचे दिग्दर्शन करणे म्हणजे चित्रपटात दिग्दर्शकाचा रोख पहायला मिळतो. चित्रपट समजून घेण्यासाठी वैविध्यपूर्ण चित्रपट पाहून विषय आणि आशय समजावून घेण्याची गरज आहे. चित्रपटातून मांडण्यात आलेल्या जाणिवांतून माणूस म्हणून जगता यावे. मानवी मूल्यांचे संवर्धन करणारी सृजनशील कलाकृती साकारणे म्हणजे चित्रपट निर्मिती केली पाहिजे. त्यांनी 'ग्लास', 'आर यु व्हॅलीबॉल' या डॉक्युमेंटरी आणि शॉर्ट फिल्मचे सादरीकरण केले.

लेखक-निर्माते-दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांनी चित्रपट बनवण्यासाठी लागणाऱ्या कलांची माहिती देत व्हिडिओग्राफी आणि दिग्दर्शन याबाबत मार्गदर्शन केले. चित्रपटामध्ये वापरण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानाची माहिती दिली.

सूत्रसंचालन प्राजक्ता शहा यांनी तर प्रस्तावना डॉ. निशा पवार यांनी केली. अनुराधा ईनामदार यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले. डॉ. शिवाजी जाधव, प्रा. सचिन दिवाण, वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्दचे प्रा. आनंदा पांढरबळे, प्रा. दिग्विजय कुंभार आदी उपस्थित होते. कार्यशाळेत शिवाजी विद्यापीठ, संजय घोडावत विद्यापीठ, शहिद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय, तिटवे, डी. आर. माने महाविद्यालय, कागल आणि वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्दच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



कोल्हापूर : येथे कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना डॉ. ओंकार काकडे. सोबत अनुप जत्राटकर, डॉ. अनमोल कोठाडिया, प्रा. डॉ. निशा पवार.

01 JUL 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहू चरित्रग्रंथ कानपूर विद्यापीठाला भेट

## कानपूरच्या विद्यापीठात दाखल झालेले हिंदीमधील पहिलेच शाहू चरित्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त शिवाजी विद्यापीठ आणि कानपूर (उत्तर प्रदेश) येथील छत्रपती शाहूजी महाराज युनिव्हर्सिटी यांच्यातील सहसंबंधांची एक अनोखी सुरवात झाली. शिवाजी विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशक धोरण केंद्रातील प्रा. अविनाश भाले यांना कानपूर विद्यापीठाने शाहू जयंतीच्या मुख्य कार्यक्रमात बीजभाषक म्हणून आमंत्रित केले. त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कानपूर विद्यापीठास ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार लिखित व हिंदी अनुवादित शाहू चरित्र ग्रंथ भेट दिले. कानपूरच्या विद्यापीठात दाखल झालेले हिंदीमधील हे पहिलेच शाहू चरित्र ठरले. त्याबद्दलची कृतज्ञता कुलगुरू प्रा. विनयकुमार पाठक यांनी व्यक्त केली.

१०२ वर्षांपूर्वी छत्रपती शाहू महाराज कानपूर येथे गेले असता त्यांच्या कर्तृत्वाने व वाणीने प्रभावित झालेल्या कानपूरच्या जनतेने महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी बहाल करून त्यांचा गौरव केला. त्या कानपूरमध्ये राजर्षींच्या नावे असणाऱ्या विद्यापीठाशी स्नेहबंधांचा एक नवा अध्याय आता माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या साक्षीने सुरू झाला आहे. कानपूर येथील छत्रपती शाहूजी महाराज विद्यापीठात स्कूल ऑफ आर्ट्स ह्युमॅनिटी आणि सोशल सायन्सेसतर्फे आयोजित शाहू जयंतीच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी खासदार संभाजीराजे छत्रपती होते. तर प्रा. अविनाश भाले हे बीजभाषक होते.



**कोल्हापूर : राजर्षी शाहू चरित्रग्रंथांचा हिंदी अनुवादित ग्रंथ कानपूरच्या छत्रपती शाहूजी महाराज विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विनयकुमार पाठक यांच्याकडे देताना माजी खासदार संभाजीराजे छत्रपती. सोबत शिवाजी विद्यापीठाचे प्रा. अविनाश**

प्रा. भाले म्हणाले, शाहूंची राजवट स्वतंत्र भारतासाठी आदर्श ठरली आणि त्यांनी राबवलेली समावेशक धोरणे आणि योजना आजही देशास मार्गदर्शक आहेत. शाहू महाराजांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक धोरणांची माहिती दिली. कुलगुरू प्रा. विनयकुमार पाठक यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पथनाट्य सादर करण्यात आले. डॉ. पतंजली मिश्रा यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मानस उपाध्याय यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. अनिलकुमार यादव यांनी आभार मानले.

### विधवा महिलांच्या मुलांच्या शिक्षणासाठी १० लाखांची मदत

माजी राज्यसभा खासदार संभाजी राजे छत्रपती यांनी त्यांच्या ट्रस्टच्या वतीने विधवांच्या मुलांच्या शिक्षणासाठी दहा लाख रुपयांची मदत जाहीर केली. कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठ आणि कानपूर विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करून दोन विद्यापीठे आणि शहरे जोडण्याचा प्रस्तावही त्यांनी मांडला. या कार्यक्रमात कुलपती आणि राज्यपाल आनंदीबेन पटेल ऑनलाइन सहभागी झाल्या. छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचा उल्लेख करून त्यांनी सामाजिक कुप्रथा निर्मूलनासाठी विद्यापीठांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले.

तरुण भारत

# पदवीधर मतदार नावनोंदणीला ७ जुलैपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळासाठी पदवीधर मतदार नावनोंदणीला ७ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या आशयाचे परिपत्रक विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केले आहे. गुरुवारी सायंकाळपर्यंत २१ हजार ५०० पदवीधर मतदारांची ऑनलाईन नावनोंदणी झालेली आहे. विद्यापीठ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदवीधर नावनोंदणीला ३० जूनपर्यंत मुदत होती. परंतु शिक्षण संस्थाचालक आणि विद्यार्थी संघटनांच्या मागणीनुसार पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये या हेतूने महाविद्यालयीन शिक्षक, महाविद्यालयीन विभागप्रमुख, प्राचार्य व व्यवस्थापन प्रतिनिधी यांची विद्यापीठ संकेतस्थळावर ७ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पूरक कागदपत्रासह ११ जुलैपर्यंत विद्यापीठाकडे ऑनलाईन पध्दतीने नावनोंदणी करणे आवश्यक आहे.